| नियमित दिवाणी दावा क्र.५५०/२०२४ मधील निशाणी क्र.४७ वरील आदेश. (चांगदेव टकले व इतर विरुध्द खंडू कोकरे व इतर) | MHAH140009762024 |
|---|---|

प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादींने वादीस दावा मिळकतीमधील ऊसतोड व ऊस वाहतूकीसाठी बेकायदेशीर हरकत करु नये असा तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत वादींने शपथपत्र दाखल केले आहे.

२. वादीने कथन केले आहे की, वादींने प्रतिवादींविरुध्द निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी दावा दाखल केला आहे. दाव्यातील प्रतिवादी क्र. २ व ४ यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश झालेला असून प्रतिवादी क्र.१ व ३ यांची कैफियत येणेवर आहे. दावा कलम १ई च्या मधून असलेल्या दक्षिण–उत्तर रस्ता गट क्र.३१२ च्या उत्तर बांधावरुन गट क्र.३१२ च्या दक्षिण बांधाने असलेल्या रस्त्याशिवाय इतर कोणताही रस्ता नाही व नव्हता. सदरचा रस्ता मा. तहसिलदार, नेवासा यांनी दिला असून सदरच्या निकालावर अपील दाखल झाले नाही व कोणताही मनाई हुकुम नाही. रामेश्वर अशोक मुंगसे व गणेश अशोक मुंगसे यांनी दावा कलम १ब गट क्र. ३००/४, प्रतिवादी क्र. ५ व ६ यांनी १क गट क्र.३०३, १इ गट क्र.३०४, १उ गट क्र.३००/१ व १ऊ गट क्र.३०२ या मिळकतीमध्ये ऊसाचे पीक असून चालू गळीत हंगामासाठी सदरचा ऊस लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना व मुळा सहकारी साखर कारखाना, सोनई यांच्याकडे गळीतास पाठविणे अत्यंत गरजेचे आहे. परंतु, प्रतिवादी हे मा. तहसिलदार यांनी दिलेल्या रस्त्याच्या वहिवाटीस विनाकारण हरकत करुन ऊस वाहतूकीस हरकत करीत आहेत. प्रतिवादींने वादीला तुमचा ऊस या रस्त्याने जावू

देणार नाही अशी धमकी दि.१०.०१.२०२६ रोजी दिली. प्रतिवादी हे रस्त्यावर पाणी सोडणे, खड्डे करणे अशा प्रकारे बेकायदेशीर कृत्य करीत आहेत. सबब, दावा कलम १अ ते १इ व १उ, १ऊ यामधील ऊसतोड व ऊस वाहतूकीस प्रतिवादींने हरकत करु नये असा मनाई हुकुम मिळावा अशी वादीने मागणी केली आहे.

३. प्रतिवादी क्र. २ व ४ यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारित केला. प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी निशाणी क्र. ५६ वर प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादींने कथन केले आहे की, प्रस्तुत अर्ज खोटा व बनावट आहे. निशाणी क्र. ४७ वरील अर्ज वादी क्र. ६ व ७ यांनी दिलेला असून त्यावर त्यांची सही आहे. यापुर्वी निशाणी क्र. १२ वर दिलेला अर्ज व निशाणी क्र. ४७ वरील अर्ज एकसारखेच असून ते मुळतःच मेंटनेबल नाहीत. दाव्यातील वादी क्र. १ व २ यांनी निशाणी क्र. ४० वर सदरचा दावा चालवणे नाही असा अर्ज दिलेला असून त्यामध्ये प्रतिवादींच्या क्षेत्रातील कोणताही रस्ता नाही व नव्हता असे नमुद केलेले आहे. वादी यांनी रस्ता केस क्र. ३६/२०२३ मध्ये मा. तहसिलदार यांनी दिलेल्या रस्त्यावरून दावा दाखल केला आहे. परंतु, मा. तहसिलदार यांच्याकडील निकालावर प्रतिवादी क्र. २ यांनी उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडे आर.टी.एस. अपील नं. ९२/२०२४ दाखल केले होते. सदर अपीलाचा दिनांक ०३.०२.२०२५ रोजी प्रतिवादींच्या बाजूने निकाल होवून मा. तहसिलदार यांच्याकडील रस्ता केस क्र. ३६/२०२३ मधील निकाल रद्द केलेला आहे. त्यावर अद्याप अपील केलेले नाही. त्यामुळे आर.टी.एस. अपील क्र. ९२/२०२४ मधील निकाल आजही कायम आहे. त्यामुळे प्रतिवादींच्या क्षेत्रामधून वादींना कोणताही रस्ता

अस्तीत्वात नाही व नव्हता. वादींना त्यांच्या क्षेत्रामध्ये येण्याजाण्यासाठी दुसरा पर्यायी रस्ता उपलब्ध असून त्या रस्त्याने वादी शेतीउपयोगी औजारे, ऊस ने आण करतात. तसेच सदरचा पर्यायी रस्ता आर.टी.एस. अपील क्र. ९२/२०२४ यामधील निकालपत्रामध्ये स्पष्टपणे नमुद केलेला आहे. वादी प्रतिवादींच्या क्षेत्रामधून रस्ता करण्याच्या विचारात आहे. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. वादींतर्फे विधिज्ञ श्री. एन.एस.जोशी व प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. एस.एस.गव्हाणे यांचा युक्तीवाद ऐकला. दाखल सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. वादीने दाव्यात कथन केले आहे की, दावा मिळकत कलम १इ गट क्र.३१२/१ ही प्रतिवादींच्या नावावर आहे. वादींना त्यांच्या दावा मिळकतीत येणे–जाणे साठी प्रतिवादींच्या गट क्र. ३१२/१ मधून दक्षिण–उत्तर रस्ता आहे. सदरचा रस्ता गट क्र. ३१२/१ च्या मधून गट क्र. ३०० च्या उत्तर बांधावरुन व गट क्र. ३१२ च्या दक्षिण बाजूने पूर्व–पश्चिम पुढे गट क्र. ३०२, ३०३ व ३०४ च्या पश्चिम बाजूने तसेच गट क्र. ३१२ च्या पूर्व बाजूने जातो. वादींना सदरचा रस्ता मा. तहसिलदार यांनी दिलेला आहे. सदर निकालावर कोणतेही अपील दाखल झाले नाही व कोणताही मनाई हुकूम नाही. परंतु, प्रतिवादी यांच्या कथनानुसार मा. तहसिलदार यांच्याकडील रस्ता केस क्र. ३६/२०२३ यावर उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडे आर.टी.एस. अपील क्र. ९२/२०२४ दाखल केलेले होते. त्यावर दिनांक ०३.०२.२०२५ रोजी निकाल झालेला असून उपविभागीय अधिकारी यांनी तहसिलदार यांचा निकाल रद्द केलेला आहे. वरील कथनाच्या पृष्ठ्यर्थ प्रतिवादी यांनी निशाणी क्र. ५३ सोबत

उपविभागीय अधिकारी यांच्याकडील आर.टी.एस. अपील क्र. ९२/२०२४ याचा निकाल दाखल केलेला आहे. सदरचा निकाल दिनांक ०३.०२.२०२५ रोजीचा असून त्या निकालाअन्वये तहसिलदार यांचा रस्ता केस क्र. ३६/२०२३ मधील आदेश रद्द केलेला आहे. उपलब्ध कागदपत्रांवरून असे दिसते की, सदर आदेशावर वादींने आजपर्यंत कोणत्याही वरीष्ठ महसूल अधिका–यांकडे अपील दाखल केलेले नाही. त्याचबरोबर आर.टी.एस. अपील क्र. ९२/२०२४ याचा निकाल दिनांक ०३.०२.२०२५ रोजी झालेला आहे. त्यानंतर वादींने प्रस्तुत अर्ज दिनांक ०६.०१.२०२६ रोजी दाखल केला आहे. परंतु, प्रस्तुत अर्जामध्ये आर.टी.एस. अपील क्र. ९२/२०२४ मधील निकालाची माहिती वादींने नमुद केलेली नाही. यावरून वादीने सदरची माहिती लपवल्याचे दिसून येते. तसेच, ज्या निकालाच्या आधारे वादीने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे तो निकाल म्हणजेच मा. तहसिलदार यांच्याकडील निकाल आज रोजी अस्तीत्वात नाही.

६. तसेच, वादीने प्रस्तुत दाव्यामध्ये निशाणी क्र. ५ वर तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे. त्याच मागणीकरीता वादींने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. निशाणी क्र. ५ वरील अर्ज दिनांक २०.०२.२०२५ पासून युक्तीवादासाठी प्रलंबीत आहे. वास्तविक पाहता वादींचा निशाणी क्र. ५ वरील अर्ज प्रलंबीत असतांना त्याच मागणीकरीता दुसरा अर्ज दाखल करण्याची कोणतीही कायदेशीर तरतुद नाही. सबब, वरील सर्व कारणांकरीता वादींचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

वादींचा निशाणी क्र. ४७ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

SANDHYA YUVRAJ SUL Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL Date: 2026.02.16 18:05:54 +0530

**(संध्या यु. सुळ)**

दिनांक–१६/०२/२०२६

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

नेवासा, जि. अहमदनगर